PARLE MAHOTSAV

Organiser - ADV. PARAG ALAVANI, President, Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahostav.com

PARLE MAHOTSAV

**कृपया प्रसिद्धीकरिता**

## १४ व्या पार्ले महोत्सवाच्या स्वरचित काव्यवाचन स्पर्धेत रंगले स्पर्धक

**दिनांक- २६.१२.२०१३**

मुंबईः १४ व्या पार्ले महोत्सवाच्या सहाव्या दिवशी स्वरचित काव्य वाचन स्पर्धा पार्ले महोत्सवाच्या स्व.विनय आपटे कलानगरीमध्ये पार पडली. दोनशे हून अधिक नवोदित कवी स्पर्धकांनी आपल्या कविता सादर केल्या. तसेच नृत्य व मल्लखांब याही स्पर्धां सुरू झाल्या.

काव्यवाचन स्पर्धेत गझलकार श्री. मनोहर रणपिसे यांनी स्पर्धकांना स्पर्धा सुरू होण्यापूर्वी मार्गदर्शन केले की, स्पर्धकांनी अधिकाधीक स्पर्धेत भाग घ्यावा, पण भाग घेताना मन निकोप असावे. गैरमार्गाने मिळालेले यश क्षणिक असते. स्पर्धेत भाग घेतल्याने भाषेवरचे प्रेम वाढते आणि आपल्या संस्कृतीशी ओळख होते. कवियत्री गौरी कुलकर्णी यांनी कवितेचा आशय, शब्दोच्चार आणि सादरीकरणाकडे स्पर्धकांनी लक्ष द्यावे असे सांगितले. बाल साहित्यकार कवी एकनाथ आव्हाड आणि कवी शांताराम लोखंडे यांनीही स्पर्धकांना मार्गदर्शन केले.

या प्रसंगी स्पर्धकांनी राजकीय, सामाजिक, पर्यावरण, महिला सुरक्षितेता अशा संवेदनशील विषयावर सादर केलेल्या कविता उपस्थितांच्या ऱ्हदयाला भिडल्या. आयोजक ॲड. पराग अळवणी यांनीही नवोदित कवी स्पर्धकांचे कौतुक केले.

---

सदर पत्रक श्रीकृष्ण आंबेकर, कार्यालय प्रमुख, पार्ले महोत्सव यांनी प्रसिद्ध केले आहे.